## आतील पानात

- ओबीसी आरक्षण बचावसाठी नागपुरात ३० ऑगस्टपासून साखळी उपोषण
- विकास ही न थांबणारी निरंतर चालणारी प्रक्रिया : आ. काशिनाथ दाते
- नगर-पुणे महामार्गावर दहशत माजवणारे टोळके जेरबंद

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

ज्या दिवशी आपले विचार
मोठे होतील, त्या दिवशी
मोठे मोठे लोक
आपला विचार करायला लागतील.

वर्ष : ०५ | अंक : १४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## सरपंच महिलांनी दारूबंदी विषयी दिले निवेदन




**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.२८, पोंभोर्णा (चंद्रपूर):** तालुकास्तरीय शांतता समितीची बैठक उपविभागीय अधिकारी लगीमा तिवारी, तहसीलदार मोहनी सेलवटकर, ठाणेदार राजकमल वाघमारे यांच्या उपस्थित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात, शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी आगामी काळात सण गणपती उत्सव आहेत. त्यात शांतता राहावी यासाठी त्या दिवसात दारूबंदी ठेवावी यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी कु. अलका आत्राम, माजी सभापती, रोहिणी नैताम, सरपंच शुभांगी कुत्तरमारे, सरपंच शालिनी सिडाम, सरपंच मीनाक्षी ढुमणे, सरपंच दर्शना जुमनाचे, सरपंच रामेश्वरी लेनगुडे, सरपंच निरंजना म ळावी, सरपंच वर्षा पिपळे, सरपंच पुष्पा कुडमे आदी महिला उपस्थित होत्या.

## नवीन रेल्वे मार्गाला शेतकऱ्यांचा विरोध...

### जनसुनावणीत नांदगाव (पोडे) येथील ग्रामस्थांचा आक्रोश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २८, विसापूर (चंद्रपूर) :** रेल्वे प्रशासनाने बाबुपेठ ते सास्ती दरम्यान नवीन रेल्वे मार्ग प्रस्तावित केला आहे. याबाबत बल्लारपूर उपविभागीय कार्यालयात आज गुरूवार दिनांक २८ रोजी जनसुनावणी आयोजित केली. यामध्ये नांदगाव (पोडे) येथील शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी जोरदार प्रतीकार केला. उपविभागीय अधिकारी अजय चरडे यांना निवेदनाद्वारे नवीन रेल्वे मार्गाला प्रचंड विरोध केला. रेल्वे प्रशासनाने बाबुपेठ ते सास्ती दरम्यान नवीन रेल्वे मार्ग करण्यासाठी रेल्वे अधिनियम १९८९ , रेल्वे (सुधारणा) अधिनियम २००८ अन्वये सक्षम भुसपांदन प्राधिकारी व उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने बल्लारपूर येथे जनसुनावणी आयोजित केली. यावेळी नांदगाव (पोडे) येथील ग्रामस्थांचा, शेतकऱ्यांचा व जनप्रतिनीधींचा समावेश होता. यामध्ये बाबुपेठ ते सास्ती दरम्यान नवीन रेल्वे मार्गाला विरोध करण्यात आला.

दरम्यान रेल्वे चे अभियंता नवीन शर्मा, उपविभागीय अधिकारी अजय चरडे, वेकोलिचे क्षेत्र नियोजन अधिकारी अविनाश तळवलकर यांनी शेतकऱ्यांना रेल्वे मार्गाबाबत समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मात्र रेल्वे मार्गामुळे कृषी क्षेत्राची विभागणी होण्याचा धोका असल्याच्या भूमिकेवर शेतकरी अडून होते. हा प्रकल्प शेतकऱ्यांना उद्धवस्त करणारा असल्याचा आरोप केला. रेल्वे प्रशासनाने याची दखल घ्यावी. अन्यथा जन आंदोलन करण्याचा इशारा दिला. कयावेळी नांदगाव (पोडे) येथील सरपंच वनिता वैद्य, उपसरपंच मल्लेश कोडारी, सुनील खापने, स्वराज्य शेतकरी संघटनेचे सूर्या अडबाले, गणेश आमने, देनानंद शेंडे, शैलेश लांबट, गौरव पोडे, लक्ष्मण पोडे, मनोहर पोडे, यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## मंद्रूपच्या तनुजा पवारला खेलो इंडिया अस्मिता लीग स्पर्धेत सुवर्णपदक

**अक्षराज प्रतिनिधी**




**दि.२८, सोलापूर :** खेलो इंडिया तायक्कांदो अस्मिता लीग ही स्पर्धा नुकतीच विभागीय क्रीडा संकुल येरवडा पुणे येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपची तनुजा पवार ही खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवले. या यशाबद्दल त्यांना मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच नेताजी पवार यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबसे, महासचिव गफार पठाण, तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे सोलापूर अध्यक्ष- मा. शहाजी बापू पाटील, सचिव प्रमोद दौंडे, खजिनदार गुरुलिंग गगनहळ्ळी, सोमनाथ बनसोडे, दक्षिण सोलापूर तायक्कांडो अकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण जोडमोठे , रेश्मा राठोड यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# छत्रपतींचा आशीर्वाद पाठीशी; मराठा आरक्षणाचा लढा आपण जिंकणार : मनोज जरांगे पाटील

## जरांगे पाटील यांचे जुन्नर तालुक्यात जल्लोषात स्वागत





▪ **अक्षराज प्रतिनिधी**

**ओतूर :** मराठा आरक्षणासाठी चाललेले शांततेचे आंदोलन सरकार रोखू शकत नाही,मराठा आरक्षणासाठी छत्रपती शिवराय, भवानी माता आणि माँसाहेब जिजाऊंचे बळ आपल्या पाठीशी आहे.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचा आशीर्वाद घेऊन आम्ही आरक्षणाचा हा लढा जिंकणारच. महाराष्ट्रातील मराठी बांधवांनी शांततेत हा लढा लढायचा आहे असे मनोज जरांगे पाटील यांनी किल्ले शिवनेरी वरून मराठा बांधवांना आवाहन केले.शांततेने चाललेले आंदोलन सरकार थांबवू शकत नाही आणि आरक्षण घेतल्याशिवाय आपण थांबणार नाही, हे शांततेचे युद्ध,शांततेचे आंदोलन कोणीच रोखू शकत नाही.असे सांगून जरांगे पाटील पुढे म्हणाले की,मराठा आरक्षणासाठी ज्या-ज्या मराठी बांधवांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यांच्या पाठीमागे मराठी समाज भक्कमपणे उभा आहे,त्यांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही.मराठा आरक्षण घेतल्याशिवाय मराठा समाज मागे हटणार नाही असेही ते यावेळी म्हणाले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावं,मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एल्गार पुकारला आहे. या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे मोर्चा घेऊन बुधवारी दि.२७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत ते गुरूवारी दि.२८ रोजी पहाटे शिवजन्मभूमी जुन्नर मध्ये दाखल होताच, मराठा समाज बांधवांनी आळेफाटा,ओतूर,बनकर फाटा, नारायणगाव येथे मराठा समाज

हजारोंच्या संख्येने जरांगे यांच्या स्वागतासाठी एकत्र आला होता. जेसीबीवरून ठिक-ठिकाणी फुलांचा वर्षाव करत,त्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर जरांगे पाटील हे मराठा बांधवांना घेऊन,किल्ले शिवनेरीच्या दिशेने रवाना झाले. शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यात येताच त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. हजारो मराठा बांधवांसह मनोज जरांगे दि.२९ रोजी मुंबईत आंदोलन करण्यावर ठाम आहेत. ओबीसीतूनच मराठा आरक्षण द्या, या मागणीसाठी मनोज जरांगे आझाद मैदानावर आंदोलन करणार आहेत. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने मराठा बांधव मुंबईच्या दिशेने निघाले आहेत.मनोज जरांगेंचा मोर्चा गुरूवारी जुन्नरमध्ये दाखल झाला. जरांगे पाटील किल्ले ''शिवनेरी'' गडावर छत्रपती शिवरायांच्या चरणी नतमस्तक होऊन, शिवनेरीची माती कपाळी लावली त्यानंतर जुन्नर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ मुख्य चौकात मराठी समाजाच्या बांधवांना त्यांनी संबोधित केले.

त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांचा मोर्चा मुंबईच्या दिशेने रवाना झाला.

## ग्रामसेवक नमुना नंबर ८ चा उतारा देण्यास टाळाटाळ घरकुल लाभार्थी हैराण; गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार

▪ **अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** आपल्या अधिकारांचा गैरवापर करून सामान्य नागरिकांना वेठीस धरणाऱ्या एका ग्रामसेवकांची तक्रार थेट गटविकास अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून नमुना नंबर ८ चा उतारा देण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या ग्रामसेवकांच्या मनमानी कारभारामुळे लाभार्थी त्रस्त झाला आहे.

मुदखेड तालुक्यातील वाई येथील रहिवासी दत्ता मरीबा भादुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्यांना त्यांच्या घरकुलाचे बिल काढण्यासाठी नमुना नंबर ८ चा उताऱ्याची आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांनी गावचे ग्रामसेवक अंदेलवाड यांच्याकडे नमुना नंबर ८ चा उतारा मागण्यासाठी अर्जदार गेले असता ग्रामसेवक यांनी असे सांगितले की सरपंच आणि उपसरपंच यांना विचारल्याशिवाय मी तुम्हाला नमुना नंबर ८ चा उतारा देऊ शकत नाही कारण नमुना नंबर ८ चा उतारा जरी त्यांच्या नावे असला तरी आमच्या आदेशाशिवाय दयवयाचा नाही असे सरपंच व उपसरपंच यांनी ग्रामसेवकांस सांगितले.

दत्ता मरीबा भादुरे यांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीत जाऊन पाठपुरावा केला. पंतप्रधान घरकुल योजनेचा मी लाभार्थी असल्यामुळे घरकुलाचे बांधकामाचे बिल काढण्यासाठी मला बांधकाम अभियंता यांनी नमुना नंबर ८ चा उतारा मागतीला होता म्हणून मी ग्रामसेवकां कडे गेलो असता मला घरपट्टी भरण्यास सांगितले असता मी माझ्या कडे जेवढे पैसे होते. तेवढे घरपट्टी २६०० रु भरलो तरी ग्रामसेवक म्हणत आहेत की पूर्ण घरपट्टी भरल्याशिवाय मी तुम्हाला नमुना नंबर ८ चा उत्तरा देत नाही.

माझ्या नमुना नंबर ८ चा उतारा असून मला नमुना नंबर ८ चा उतारा देण्यासाठी गावचे सरपंच व उपसरपंच आणि ग्रामसेवक यांनी मला नकार दिला आहे. पण प्रत्येक वेळी त्यांना आज-उद्या असे सांगून टाळले जात होते. यामुळे त्यांचे घरकुलाचे बांधकामाचे बिल काढण्याचे काम रखडले.

ग्रामसेवकांच्या या असंवेदनशील वृत्तीमुळे त्रस्त होऊन अखेर त्यांनी या प्रकरणाची तक्रार थेट गटविकास अधिकारी यांच्याकडे केली. या घटनेमुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा अधिकाऱ्यांवर वेळीच कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासन सदैव प्रयत्नशील - जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

▪ **अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.२८, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासन सदैव प्रयत्नशील आहे असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त खेळाडूंच्या सन्मान प्रसंगी काढले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात यावे. जिल्ह्यातील खेळाडूंसाठी ज्या प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध आहेत त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. खेळाडूंचा कल पाहून त्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा पुरविण्यात येतील. जिल्ह्यातील खेळाडू बरोबर संवाद साधण्यासाठी एक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंची नोंदणी करावी. ग्रामीण भागातील तालुका क्रीडा संकुलामध्ये सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. खेळाडूंना शासकीय सेवेत सुध्दा प्राधान्य देण्यात येते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, पुरस्कार प्राप्त खेळाडू व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

पवन मुकुंद भोईर (जिम्नॅस्टिक्स), संयुक्त प्रसेन काळे (रिदमिक जिम्नॅस्टिक्स ), आर्यन भालचंद्र जोशी (बुध्दीबळ), धर्मेंद्रकुमार यादव (पॉवर लिफ्टिंग), उदय उमेश उतेकर (जलतरण वॉटरपोलो), अपूर्वा महेश पाटील (ज्युदो), अजित कारभारी, कु. शौर्या आंबुरे (मैदानी खेळ-हर्डल्स), शरद कुलकर्णी जेष्ठ गिर्यारोहक यांचा जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते शाल, ट्रॉफी देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी पुरस्कार प्राप्त खेळाडूंनी आपले मनोगत व्यक्त केले.




## महाराष्ट्र संतांचा आहे, नथुरामचा नाही!

महाराष्ट्राच्या सामाजिक व आध्यात्मिक जीवनाचा पाया संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या शिकवणुकीवर आधारित आहे. काही स्वार्थी घटक आणि तथाकथित कीर्तनकार राजकीय फायद्यासाठी याच परंपरेचा गैरवापर करत आहेत. ते समाजात द्वेष पसरवून महाराष्ट्राच्या मूळ संस्कृतीवर घाव घालत आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत वारकरी संप्रदायाचे योगदान खूप मोठे आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम अशा संतांनी घडवलेली ही परंपरा केवळ भक्तीमार्ग नसून, समानता आणि बंधुभावाचे सामाजिक आंदोलन आहे. वारकरी संप्रदायाने जातीभेद, लिंगभेद, पंथभेद बाजूला सारून सर्वसामान्यांमध्ये आध्यात्मिक लोकशाही रुजवली. संतपरंपरेचा हाच वारसा महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. पण दुर्दैवाने, राजकीय फायद्यासाठी याच आत्म्यावर घाव घालण्याचा प्रयत्न सत्ताधारी आणि वारकरी संप्रदायात घुसलेल्या त्यांच्या हस्तकांकडून सुरू आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी वेदांत, नाथपंथ आणि वैष्णव भक्तीचा समन्वय साधून भक्तीला विचारशीलतेची आणि समतेची जोड दिली. तुकाराम महाराजांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधत चारित्र्याला जीवनाचे मूल्य मानले. एकनाथ महाराजांनी अस्पृश्यतेला विरोध करून सामाजिक सलोखा वाढवला. गोरा कुंभार, सावता माळी, सेना, चोखामेळा, जनाबाई यांनी आपलं रोजचं श्रमशील जीवन सांभाळून भक्ती करता येते हे दाखवून दिले. या सर्व महान संतांनी जन्मावर नव्हे, तर चारित्र्यावर माणसाचे मोठेपण ठरते, ही शिकवण दिली. वारीच्या सोहळ्यात कोणताही जातीभेद किंवा धर्मभेद नसतो; सर्वजण एकत्र चालतात, राहतात आणि जेवतात. म्हणूनच वारकरी परंपरेने समाजाला प्रेम, बंधुभाव आणि नैतिकतेची शिकवण दिली. वारकरी संतांनी विद्वत्तेचा बोजा न टाकता जनभाषेला प्रतिष्ठा दिली. संस्कृत न समजणाऱ्या जनतेसाठी त्यांनी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम गाथा असे ग्रंथ रचले. अभंग, ओव्या, भारुडे, कीर्तन या माध्यमांतून त्यांनी अध्यात्मासोबतच लोकशिक्षणही दिले. विठ्ठल हा सर्वांचा आहे; देव कोणाच्या मक्तेदारीत नाही, ही आपल्या संतांची शिकवण आहे. यामुळेच वारकरी परंपरा सामाजिक सलोख्याचा आणि धर्मनिरपेक्षतेचा पाया ठरली. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचे कार्यही याच पायावर आधारलेले आहे. त्यांनी हीच समतेची शिकवण पुढे नेली. भारतीय संविधानही याच पायावर उभे आहे. पण दुर्दैवाने, याच वारकरी परंपरेचा काही विकृत वापर आज होताना दिसतो. काही तथाकथित कीर्तनकार संप्रदायाच्या नावाखाली राजकीय पक्षांची सुपारी घेतात आणि समाजात द्वेष पसरवतात. लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या पराभवानंतर 'लव्ह जिहाद'सारख्या मुद्द्यांचा वापर करून समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. उत्तर भारतातून बागेश्वर बाबा, प्रदीप मिश्रा यांच्यासारख्या 'बाबा-बुवांना' आणून त्यांच्या कार्यक्रमांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. या कार्यक्रमांचा उद्देश आध्यात्मिक नव्हता, तर शुद्ध राजकीय होता. या धार्मिक व्यासपीठांचा वापर करून सत्ताधाऱ्यांनी आपली राजकीय पोळी भाजून घेतली. विधानसभा निवडणुकीत मतदार यादीतील गोंधळासोबतच सत्ताधाऱ्यांनी धार्मिक ध्रुवीकरणाचा एक पॅटर्न राबवला. संगमनेरसारख्या एका विधानसभा मतदारसंघात, जिथे स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरातांनी सहकारातून समृद्धीचा आदर्श पॅटर्न उभा करत दुष्काळी पट्ट्याचे नंदनवन केले. शेती आणि दुधाच्या व्यवसायातून आर्थिक संपन्नता आणली. बाळासाहेब थोरातांच्या सुसंस्कृत राजकारणाने सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला. पण तिथे असंस्कृत शक्तींची विकृत दृष्टी पडली. धार्मिक तेढ निर्माण करण्याचे षडयंत्र सुरू झाले. प्रत्येक घटनेला धार्मिक आणि जातीय रंग देऊन अपप्रचार आणि अफवांच्या माध्यमातून तणाव निर्माण केला. सामाजिक शांतता, सौहार्द आणि बंधुभावाचा बळी देऊन निवडणूक जिंकली. निवडणूक संपली, पण ती जिंकण्यासाठी निर्माण केलेली विखारी पिलावळ मात्र सामाजिक शांतता संपवण्यासाठी वळवळत आहे. कीर्तन हे महाराष्ट्राच्या संतपरंपरेने दिलेले एक अद्वितीय व्यासपीठ आहे. त्यातून केवळ आध्यात्मिक चिंतनच नव्हे, तर समाजप्रबोधन, लोकशिक्षण आणि नैतिक मूल्यांचा प्रसार झाला. शतकानुशतके कीर्तनाने सामान्य जनतेला सत्य-असत्याचा भेद शिकवला, अस्पृश्यतेला फाटा दिला आणि समतेची शिकवण दिली.

# हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

आज २९ ऑगस्ट, राष्ट्रीय क्रीडा दिन. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून मेजर ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेलरत्न पुरस्काराला देखील मेजर ध्यानचंद यांचे नाव देऊन मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा यथोचित असा गौरव केला आहे. ज्या खेळाडूंनी वर्षभर सर्वोत्तम कामगिरी करून जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे अशा खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो.

२९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ मध्ये



वयाच्या सोळाव्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळत असे. हॉकीतील त्यांचे कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरू होते. पुढे मेजर ध्यानचंद हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी हाच त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या तर केवळ एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. मेजर ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरचे नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानात कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टीक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती. हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ ( एमस्टरडॅम ) १९३१ ( लॉस अँजेलीस ) १९३६ ( बर्लिन ) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यात झालेल्या ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांनी एकहाती विजय मिळवून दिला होता. ही लढत पाहायला जर्मनीचे हुकूमशहा एडॉल्फ हिटलर उपस्थित होते. ध्यानचंद यांच्या खेळाने ते चांगलेच प्रभावित झाले. ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा एडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती ; पण देशप्रेमी आणि स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीस मध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले. त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान खेळाडूचे निधन झाले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे. हॉकीचे जादुगर मेजर ध्यानचंद यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

## बाप्पा विघ्नहर्ता !

थाटात येतो
राजा सारखा बसतो,
भक्तांकडे पाहून
गालात हसतो...

पाहताच बाप्पाला
येतो आनंदाचा पूर ,
ढोल ताशा नगाऱ्याचे
गगनाला भिडतात सूर...

थोड्याच दिवसांसाठी बाप्पा
भक्तांना भेटायला येतो,
वर्षभराचा दुरावा एका
क्षणात दूर करतो...

नाजूक त्याचे डोळे
शेला असतो भरजरी,
हिरे जडित मुकुट
पितांबर त्याचा भारी...

वाजत गाजत बाप्पा
मखरात येऊन बसतो,
भक्तांच्या मनात एक
वेगळाच उत्साह दाटतो...

सारा परिसर झगमगतो
लाईट तोरणे सजतात
बाप्पाच्या मंडपात
आरतीचे सूर उमटतात

बाप्पाच्या आगमनाचा
सोहळा रंगतो छान
बाप्पा विघ्नहर्त्याची
वेगळीच असते शान...

अशा आमच्या बाप्पाची
रंगत असते न्यारी,
भक्तांच्या गर्दीतून निघते
बाप्पा विघ्नहर्त्याची स्वारी...

असा आमचा बाप्पा
सकळ विघ्नहर्ता,
तोच सुखकर्ता
तोच दुःखहर्ता ...!

- ज्योती रावराणे,
कांजुरमार्ग, मुंबई

# ओबीसी आरक्षण बचावसाठी नागपुरात ३० ऑगस्टपासून साखळी उपोषण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २८, चंद्रपूर :** मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यात येऊ नये यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी नागपुरातील संविधान चौकात ३० ऑगस्टपासून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे कार्यकर्ते साखळी उपोषण करणार आहेत. महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी ही घोषणा गुरुवारी दुपारी केली. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रणनीती निर्धारित करण्यासाठी गुरुवारी नागपुरातील पावनभूमी परिसरातील डॉ. बबनराव तायवाडे यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर साखळी उपोषणाची घोषणा करण्यात आली. मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसींतून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी मुंबईत उपोषण आंदोलन पुकारले आहे. यापूर्वीही मराठा समाज मागास नसल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना आरक्षण देता येत नसल्याचे स्पष्ट झाले. तरीही वारंवार ओबीसींतून आरक्षणाची मागणी त्यांच्याकडून केली जात आहे. सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे ओबीसी खपवून घेणार नाही. सरकार यावर काय भूमिका घेते याकडे आमचे लक्ष असल्याचेही बैठकीत पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

बैठकीला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, कार्याध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, सहसचिव शरद वानखेडे, कोषाध्यक्ष गुणेश्वर आरिकर, युवा महासंघ अध्यक्ष सुभाष घाटे, प्रदेश अध्यक्ष प्रकाश भागरथ, कार्याध्यक्ष दिनेश चोखारे, किसान महासंघाचे अध्यक्ष प्रकाश साबळे, योद्धा रवींद्र टोंगे, ऋषभ राऊत, राजू चौधरी, परमेश्वर राऊत, सुनील शिंदे, सूरज बेलोकर, डॉ. मुकेश पुंडके, राहुल तायडे, शकील पटेल, राहुल कारंगे, राहुल भांडेकर, विजय डवंगे, अनंता बारसगडे, अर्जुन दले, अजय वीरकर, खुशाल शेंडे, विक्रम मानकर, सीमा वाघ, रागिणी शेंडे, यांच्यासह ओबीसी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.




या मागण्यांसाठी साखळी उपोषण मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये ही ओबीसी समाजाची आग्रहाची मागणी आहे. अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना त्वरीत नुकसान भरपाई देण्यात यावी. ओबीसी मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रमास शंभर टक्के शिष्यवृत्ती लागु करणे. गुणवंत मुलांमुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवुन २०० विद्यार्थी करणे. महाज्योती या संस्थेकरीता एक हजार कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावी, शासन निर्णय दिनांक २८ आक्टो. २०२१ च्या नुसार ज्या प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी च्या निर्णयानुसार समाजातील संस्थाना कामात प्राधान्य देण्यात येते त्याप्रमाणे महाज्योतीची कामे ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्गातील संस्थेला रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी प्राधाण्य देण्यात यावे. म्हाडा व सिडको तर्फे बांधुन देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गाकरीता आरक्षण लागु करण्यात यावे. नागपुर येथे तयार असलेले उच्च व तंत्र विभागाचे स्व. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमीत्त बांधलेले २०० मुलींचे तयार वसतीगृह तसेच नागपुर येथे स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षानिमीत्त तयार असलेले २०० मुलांचे वसतीगृह ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी ओबीसी बहुजन कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करून शासन निर्णयान्वये इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामार्फत मुलांचे व मुलींचे वसतीगृह सुरू करण्यात यावे. ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी आर्थिक विकास महामंडळा मफित असलेली थेट कर्ज योजनेची मर्यादा १ लाख व १५ लाख रुपये कर्ज मर्यादेच्या योजनेसाठी, तसेच गहाण खतामध्ये फक्त शेतीची अट असून ती शिथिल करण्यात यावी घर., प्लॉट, दुकान इत्यादी बाबींचा समावेश व्हावा जामीनदार घेतांना केवळ सरकारी. नौकरच असावा ही अट शिथिल करण्यात यावी, ५०० सीबील स्कोरची अट शिथिल करुन लाभ धारकांना अटच नसावी. शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ या धर्तीवर इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला अँड जनार्दन पाटील ओबीसी आर्थिक विकास महामंडळ असे नाव द्यावे. प्रत्येक शहर व तालुका स्तरावर ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार आणि आदिवासी सेवक पुरस्कार याप्रमाणे डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात यावा.

अनुसूचित जाती-जमाती प्रमाणे ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्ग शेतकरुयांना १०० टक्के सवलतीवर राज्यात योजना सुरु करण्यात यावी. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व महामंडळाच्या सर्व मंजूर योजना त्वरीत सुरु करण्यात याव्यात इत्यादी मागण्या आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वर येथे गणरायाचे भक्तीपूर्ण वातावरणात आगमन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२८, महाबळेश्वर (सातारा) :** ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत वर्षभर आतुरतेने वाट पाहत असलेल्या गणेश भक्तांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन दि.२७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थीला झाले सकाळ पासून महाबळेश्वर येथे पावसाने हजेरी लावली होती. पावसाची रिपरिप सुरू असताना देखील पावसाची पर्वा न करता गणपती बाप्पाच्या आगमन सोहळ्यास पारंपारिक वेशभुषा परिधान करून बालगोपाल, जेष्ठ तसेच तरुण वर्ग भक्ती भावाने सामील झाला होता. गणपती बाप्पा मोरया... मंगलमुर्ती मोरयाच्या जयघोषात तल्लीन होऊन मुख्य बाजारपेठेतून गणेशभक्त आपल्या घरी वाजत गाजत भक्तीपुर्ण वातावरणात गणपती बाप्पाची मुर्ती हातात घेऊन तसेच चारचाकी वाहनातून मनोभावे जात होते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मुख्य बाजरपेठ मार्गे गणपती बाप्पाची वाजत गाजत पावसाची तमा न बाळगता दुपारी चार वाजल्या पासून मिरवणूक काढली होती. बाजारपेठेत हार, फुले, दुर्वा, मिठाई, बाप्पाचे आवडते मोदक तसेच गणेश मुर्ती खरेदी करिता भक्तांनी अलोट गर्दी केली होती. महाबळेश्वरातील विविध सार्वजनिक मंडळांच्या उंच, आकर्षक, सुबक मूर्ती पाहण्या करीता बाजारपेठेत महाबळेश्वरकरांनी हजेरी लावली होती. त्याचप्रमाणे मनोभावे पूजा अर्चा करून घरोघरी व मंडाळांमध्ये लाडक्या गणपती बाप्पाच्या मुर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

## जखमी बाईकस्वाराला तत्काळ ताफ्यातील अँब्युलन्स मधून केले रुग्णालयात दाखल



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२७, ठाणे :** आज सगळीकडे गणेशोस्तवाची धूम सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संवेदनशील स्वभावाचा प्रत्यय मात्र ठाणेकरांना पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला आहे. आज सकाळी किसन नगर येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील बाप्पांची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे हे घरोघरी दीड दिवसांच्या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी शहरात फिरत होते. संध्याकाळी त्यांचा ताफा घोडबंदर रोडवर आला असता त्यांना एक तरुणाची बाईक घसरून रस्त्याच्या कडेला बसलेला दिसला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपला ताफा थांबवून गाडीतून उतरून या तरुणाची विचारपूस केली. त्यावेळी या तरुणाने आपली दुचाकी घसरल्याने आपल्या खांद्याला दुखापत झाल्याचे त्यांना सांगितले. यावेळी त्यांनी तत्काळ आपल्या ताफ्यातील अँब्युलन्स पुढे घेत या तरुणाला त्यात घालून त्याला तत्काळ घोडबंदर रोडवरील होरायझन प्राईम रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले. तसेच आपल्या ताफ्यातील एक अधिकारी त्याची देखरेख करण्यासाठी दिला. घरोघरी आज श्री गणेशाचे आगमन झाले असल्याने विघ्नहर्ता घरोघरी विराजमान झाल्याची भावना लोकांमध्ये आहे. अशात जखमी तरुणाच्या मदतीला धावून जात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील या तरुणासाठी खरे विघ्नहर्ता ठरले आहेत.

## पाटण अर्बन बँकेचा, सात टक्के लाभांशः बाळासाहेब राजे महाडिक

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२८, पाटण (सातारा) :** पाटण अर्बन बँक वार्षिक सभा श्रीराम मंदिर पाटण येथे झाली होती त्या सभेमध्ये सभासदांना सात टक्के लाभांश देण्याचा एक मुखी निर्णय झाला होता त्यानुसार सभासदांच्या खात्यावर सात टक्के लाभांश जमा झाला आहे.

याची माहिती दि पाटण अर्बन बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब राजेमहाडिक, यांनी दि पाटण अर्बन बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी पाटण अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधवरा कपिलेश्वर, पाटण अर्बन बँकेचे व्यवस्थापक

के आर शिंदे, उपस्थित होते. पाटण अर्बन बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब राजेमहाडिक पुढे म्हणाले,

आपल्या बँकेची आर्थिक व व्यावसायिक स्थिती अधिकाधिक सुधारत असल्याचे समाधान वाटत आहे. या आधी अडचणीच्या काळात देखील बँकेने आपली सेवाभावी वृत्ती कायम ठेवून ग्राहकांच्या गरजा व अडचणी लक्षात घेऊन तसेच रिझर्व बँकेच्या नियमांची काटेकोर अमलबजावणी, सहकार खात्याचे तंतोतत पालन, तसेच ग्राहक सेवा हे केंद्रबिंदू मानून दिलेल्या तत्परसेवा, पारदर्शक कारभार, संचालक मंडळ व सेवक वर्ग या मधील सुसंवाद, त्याच बरोबर बँकेचे संस्थापक अध्यक्ष मा विक्रमसिंहजी पाटणकर माजी मंत्री सार्वजनिक बांधकाम, व भारतीय जनता पार्टीचे युवा नेते सातारा जिल्हा बँकेचे संचालक, सत्यजितसिंह पाटणकर, यांचे बहुमूल्य मार्गदर्शन, आर्थिक शिस्त, व्यवहारिक व आर्थिक दृष्टिकोन या सर्वच बाबीवर बँकेची सन २०२४,२०२५ या आर्थिक वर्षांत. बँकेने ३०० कोटीचा व्यवसाय केला आहे. बँकेने नेत्रदिपक कामगिरी केलेली आहे. बँकेने गेल्या आर्थिक वर्षात तांत्रिक बाबी यावर विशेष भर दिलेला आहे. तसेच बँकिंग क्षेत्रात होत असलेले कमालीचे बदल लक्षात घेऊन मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीने सर्वकष प्रशिक्षण या बाबीस बँकेने कमालीचे महत्व दिलेले आहे. अहवाल वर्षात बँकेने आवश्यक तेव्हा आवश्यक त्या विषयावर संबंधित संचालक, अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या निकषानुसार सीआरएआर चे प्रमाण ९ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे आपल्या बँकेचा सीआरएआर १६.७०% इतका आहे. भारतीय रिझर्व बँकेने सीआरएआर संदर्भात वेळोवेळी निर्धारित केलेल्या मर्यादेचे बँकेने ततोतत पालन केलेले आहे. सहकार कायदा व



भारतीय रिझर्व बँकेच्या वेळोवेळी मार्गदर्शन तत्त्वाचे पालन करीत बँकेने मार्गक्रमण केलेले आहे.

बँकिंग क्षेत्रात प्रगती बाबत नवनवीन अत्याधुनिक सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यासाठी बँक नेहमीच अग्रेसर असते. यामध्ये एटीएम, पॉस मशीनद्वरे सेवा, डिजिटल सातबारा सुविधा तसेच शासकीय अनुदान थेट खात्यावर उपलब्ध करून देणे इत्यादी सेवा आम्ही देत आहोत. त्याचप्रमाणे आपल्या बँकेच्या या सालात कर्जासाठी किमान व्याजदर, कर्ज वितरण सुलभ पद्धत, अत्यल्प छाननी शुल्क, ईएमआय सुविधा व दैनंदिन शिल्लक ठेवीवर व्याज देणे अशा विविध विषय आपण करत आहोत. बँकेच्या एटीएम व पॉस मशीन सुविधा द्वरे. मिळणारा भरघोस प्रतिसाद पाहता येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये आणखी चार एटीएम व अधिकाधिक ग्राहकाना पॉस मशीन सुविधा आम्ही पुरवणार आहोत. तसेच पुढील महिन्यापासून खाते सुरू करणाऱ्या प्रत्येक खातेदारास आम्ही एटीएम कार्डचा पुरवठा करण्याचा मानस आहे. आता पर्यंत १०, हजार एटीएम कार्ड ग्राहकांना वितरण केली आहेत

## क्रांतीसुर्यमाध्यमिकविद्यालयातीलविद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप व शेतकऱ्यांचा सन्मान

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२८, केज (बीड) :** केज तालुक्यातील सोनेसांगवी येथील क्रांतीसुर्य माध्यमिक विद्यालयाच्या दहावीच्या वर्गातील दहा विद्यार्थ्यांना बायोस्टॅड इंडिया कंपनीकडून प्रत्येकी अडीच हजार रुपये प्रमाणे २५ हजार रुपयांचा धनादेश देऊन शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. तसेच याप्रसंगी परिसरातील प्रगतशील शेतकऱ्यांचा गमजा व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा आणि त्यांच्या शिक्षणाला आर्थिक आधार मिळावा तसेच प्रगतशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने बायोस्टॅड इंडिया कंपनी ली मुंबई व तुळजाई ॲग्रो एजन्सी माळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२८) विद्यार्थी पालक व शेतकरी मेळाव्यात 'बायोझाइम जीवन प्रगती शिष्यवृत्ती' या उपक्रमांतर्गत दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या ठोंबरे वैष्णवी, साखरे गौरवी, ओव्हाळ गौरी, लांडगे गायत्री, ईटकर श्रावणी, लांडगे श्रेयश, काशीद अभिषेक, वैरागे चैतन्य, ओव्हाळ पुष्कर, शेख फैसल या विद्यार्थ्यांना प्रत्येकी अडीच हजार प्रमाणे एकूण २५ हजार रुपयांचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच याप्रसंगी पालक व प्रगतशील शेतकरी यांचा गमजा व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष आप्पासाहेब ईखे, सचिव अशोक ईखे, मुख्याध्यापक पालकर, प्रगतशील शेतकरी बब्रुवाहन कणसे, विजयकुमारी ईखे, सर्जेराव लांडगे, माणिक कुपकर, श्रीराम लोकरे, बळीराम लोकरे, सूर्यकांत सरवदे, नेहरकर, मस्के यांच्यासह विद्यार्थी पालक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकास ही न थांबणारी निरंतर चालणारी प्रक्रिया : आ. काशिनाथ दाते

### वारणवाडीत ७९ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** रोज नव्याने लक्षावधी रुपयांची विकासकामे मार्गी लागत असली तरीही नागरिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्याच्या दृष्टीकोनातून रोज नव्याने विविध समस्या उभ्या राहत असतात. अशा समस्यांची प्राधान्याने सोडवणूक करणे ही लोकप्रतिनिधी म्हणुन माझी जबाबदारी आहे. ह्याची प्रकर्षाने जाणीव असून विकास ही न थांबणारी व निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने पारनेर-नगर मतदार संघातील विविध विकासकामांचा जबाबदारीपूर्वक शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करून विकास कामे मार्गी लावली जात असल्याचे मत आमदार काशिनाथ दाते यांनी रविवार (दि. २४)रोजी वारणवाडी येथिल विविध विकासकामांच्या भुमिपूजन प्रसंगी व्यक्त केले.

वारणवाडी येथे पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते ५ एम.व्हि.ए नविन ट्रान्सफार्मर (४५ लाख), जि.प.प्रा. शाळा खोली बांधकाम (१२ लाख), काशिद वस्ती येथे नविन लाईट जोडणी (१२ लाख) तसेच हांडेवाडा बिरोबा मंदीर सभामंडप (१० लाख) अशा एकुण ७९ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.



कार्यक्रमात पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले कि, पारनेर-नगर मतदार संघाच्या विकासासाठी आपले सातत्याने प्रयत्न सुरु असून मतदार संघातील जनतेच्या सार्वजनिक इच्छा-आकांक्षांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री आदींच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात आपल्याला मदत होत आहे. कामटवाडी-वारणवाडी या गावांचा आपल्या राजकीय जडणघडनीत मोठा वाटा असून यापुढील काळात विधानसभा पदाच्या माध्यमातून या भागातील जनतेला उचित न्याय देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यावेळी प्रमुख मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाद्वारे 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, ठाणे :** गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

**नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता...**

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्या वतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

**गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृती...**

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा' या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणी दरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# नगर-पुणे महामार्गावर दहशत माजवणारे टोळके जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; सुप्यातील जबरी चोरीचे तीन गुन्हे उघड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८,अहिल्यानगर :** नगर-पुणे महामार्गावर प्रवाशांना लुटणाऱ्या दोन टोळ्यातील आरोपीच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेचा पथकाला यश आले आहे. सुपा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या जबरी चोरीच्या तीन गुन्ह्यांचा छडा लावत चार आरोपींसह, तीन विधीसंघर्षित बालकांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. तर दोन आरोपी फरार झाले आहे. तपासादरम्यान, सुपा पोलीस ठाण्यात दाखल असलेले तीन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहे.



पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने कारवाई पार पडली. पथकाला सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपीनी साथीदारांसह केला असुन ते सध्या बोल्हेगाव येथील गांधीनगर परिसरात बसले असल्याची माहिति मिळाली होती. त्यानुसार पथकाने छापा टाकून यश भाऊसाहेब शिरसाठ, अथर्व रमेश सुर्यवंशी, साहील अतिफ शेख, विशाल बाबासाहेब पाटोळे सर्व (रा. बोल्हेगाव, ता.जि.अहिल्यानगर) यांच्यासह तीन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले.

त्याच्याकडे विचारपूस केली असता आरोपींनी मागील तीन ते चार दिवसापुर्वी सुपा गावाच्या शिवारात लघुशंकेसाठी थांबलेलया प्रवाशाच्या ताब्यातील टी.व्ही. एस. कंपनीची स्पोर्ट मोटारसायकल बळजबरीने हिसकवल्याची तसेच सुपा टोलनाक्या जवळील म्हसने फाटा येथे ट्रक चालकाला लुटल्याची कबुली दिली. त्यांनी धारदार शास्त्राचा धाक दाखवून प्रवाशांना जबरदस्तीने लुटल्याचे उघड झाले आहे.

आदित्य भोसले, चेतन सरोदे दोघे ( रा.गांधीनगर, बोल्हेगाव, ता.जि.अहिल्यानगर) फरार आहेत. तसेच नयन पाटोळे व प्रेम नायर यांचाही समावेश असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. तपासादरम्यान, सुपा पोलीस ठाण्यात दाखल असलेले तीन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहे. सर्व आरोपींना सुपा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय अधिकारी शिरिष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकातील पोलिस अंमलदार विष्णु भागवत, गणेश लोंढे, भिमराज खर्से, रिचर्ड गायकवाड, बाळू खेडेकर, भाऊसाहेब काळे, मनोज साखरे,फुरकान शेख, प्रशांत राठोड, तसेच सुपा पोलिस स्टेशनचे निरिक्षक ज्योती गडकरी, पोसई मंगेश नागरगोजे, मेघराज कोल्हे, योगेश सातपुते यांनी बजावली.

# ‘सेनापती बापट’च्या संचालकांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

## आर्थिक गैरव्यवहार प्रकरण : ठेवीदारांचे पैसे परत देण्याची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८,पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील अग्रगण्य समजल्या जाणार्या सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या तीन घोटाळेबाज संचालकांना अटकपूर्व जामीन देण्यास सत्र न्यायालयाचे न्यायाधीश महेश लोणे यांनी नकार दिला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पारनेर तालुक्यात मुख्यालय असलेल्या आणि राज्यभरात सुमारे २९ शाखांचा विस्तार असलेल्या सेनापती बापट संस्थेचा कारभार दोन वर्षांपासून ठप्प आहे. या संस्थेत आर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे व्यवहार पूर्णपणे बंद आहेत. या संस्थेत ठेवीदारांचे सुमारे दोनशे कोटी रुपये अडकले आहेत.

या पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या विरुद्ध ठेवीदारांचे हित संरक्षण कायदा व इतर कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. मात्र हा गुन्हा दाखल होताच फिर्यादी असलेल्या केवळ एकाच ठेवीदाराचे संस्थेने पैसे परत केले. परंतु, फिर्यादीने तक्रार बंद करण्याची विनंती न्यायालयाने फेटाळून लावली. मुळ फिर्यादीच्या या चुकिच्या भूमिकेमुळे इतर ठेवीदारांनी आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जावर हरकत घेतली होती. इतर पीडित ठेवीदारांचा फिर्यादीत समावेश व्हावा. आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळावा अशी मागणी न्यायालयाकडे करण्यात आली होती.

सेनापती बापट पतसंस्थेतील भ्रष्ट कारभार करणार्या संचालकांना तातडीने अटक करावी. त्यांच्या मालमत्ता जप्त करून विक्री करून ठेवीदारांच्या रकमा परत द्याव्यात अशी जोरदार मागणी यावेळी हस्तक्षेप अर्जदारांनी न्यायालयात केली. संस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंजाड, माजी अध्यक्ष पंडीतराव कोल्हे, संचालक अरुणा लाळगे यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले.

### १७ कोटींच्या मालमत्ता विकल्या

गेल्या वर्षभरात सेनापती बापट पतसंस्थेच्या संचालक मंडळाने संस्थेची सुमारे १७ कोटींची मालमत्ता विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार तपासी अधिकाऱ्यांनी यावेळी न्यायालयात सांगितला. पारनेर येथिल इमारत विक्री केल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे.

### धमकीची ऑडिओ क्लिप ठरली पुरावा

सेनापती बापट पतसंस्थेचा कार्यकारी संचालक रामदास झंजाडने एका ठेवीदाराला फोनवर धमकावून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघड झाला आहे. या धमकीची ऑडिओ क्लिप न्यायालयात पुरावा म्हणून हस्तक्षेप अर्जदारांनी दाखल केली. या क्लिपची न्यायालयाने दखल घेतल्याचे सुनावणीवेळी दिसून आले. इतर संचालकांनीही अर्ज दाखल केले असून २ सप्टेंबरला सुनावणी आहे. हरकत अर्जदार असलेल्या ठेवीदारांची बाजू ॲड. रामदास घावटे व ॲड. ऋषिकेश शिंदे यांनी मांडली.

# कुंडलवाडी पोलीस ठाण्याअंतर्गत ८५ ठिकाणी ‘‘श्रीं’’ची स्थापना

अक्षराज: दत्ता हमंद

दि.२८, कुंडलवाडी (नांदेड) : कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या ८५ ठिकाणी ‘‘श्रीं’’ ची स्थापना २८ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात वाजतगाजत मिरवणुका काढून करण्यात आली. शहरी भागात ४० व ग्रामीण भागात ४५ ठिकाणी गणरायाची स्थापना करण्यात आली. तसेच १५ गावांत एक गाव एक गणपती या संकल्पनेतून श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असल्याची माहिती कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी बोलताना दिली.



कुंडलवाडी शहर व परिसरात ८५ गणेश मंडळांनी गणेशाची स्थापना बुधवारी २८ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात,आनंदात ढोल-ताशांच्या गजरात वाजत गाजत करण्यात आले आहे. सण-उत्सवाच्या काळात शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, सामूहिक एकता, बंधुता कायम राहून सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून गावागावात शांततेचे वातावरण राहावे याकरिता कुंडलवाडी पोलिसांनी शांतता समितीची बैठक घेऊन योग्य त्या मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. सण उत्सवाच्या काळात शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवावी. गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्याबरोबरच अकरा दिवस गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर,निबंध स्पर्धा,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,वाचन स्पर्धा, पर्यावरण पूरक व समाज प्रबोधनावर आधारित देखावे व त्याचे उत्कृष्ट सादरीकरण करावे अशा मंडळांना कुंडलवाडी पोलीस ठाण्यातर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीस देण्यात येणार आहे.

## थोडक्यात

### केज शहरात घरोघरी गणपती बाप्पांचे उत्साहात स्वागत

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२८, केज (बीड) :** गणेश चतुर्थी निमित्ताने यावर्षी देखील केज शहरामध्ये गणरायाचे आगमन अगदी थाटामध्ये झाले. हिंदु संस्कृतीमध्ये ऑगस्ट महिना प्रामुख्याने सण उत्सवाचा असतो. रक्षाबंधन झाले की, ऑगस्ट महिन्यात येणारा उत्साहाचा व आनंदाचा सण म्हणजे गौरी गणपती उत्सव. यावर्षी दि.२७-०८-२०२५ बुधवार रोजी घरोघरी गणपती बाप्पा चे आगमन आनंदात व मोठ्या उत्साहात झाले. गल्ली गल्ली मध्ये, घरोघरी लहान मुले व स्त्री पुरुषांची बाजारात जावून घरी गणपती बाप्पा ची मुर्ती आणण्यासाठी लगबग दिसून येत होती. केज शहरामध्ये बाजारपेठेत गणपती च्या आकर्षक व सुरेख मुर्ती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यावर्षी पाऊस चांगला झाल्याने बाजारपेठेत खरेदी साठी लोकांची गर्दी दिसून येत होती. शहरातील लोकांनी आनंदी वातावरणात भक्ती भावाने गणरायाची घरोघरी स्थापना केली. यावर्षी गणपती बाप्पा चा दहा दिवसांचा मुक्काम असून अकराव्या दिवशी अनंत चतुर्दशीला विसर्जन होणार आहे.




### मौजे डोणगांव येथे ढगफुटी ! लोकांच्या घरात पाणी शिरले...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मौजे डोणगाव येथील जिल्हा परिषद शाळेपासून ते दलित वस्ती, हनुमान मंदिर या भागात पाणीच पाणी झाले आहे. येथील दलित वस्तीतील १० ते १२ घरांमध्ये पाणी शिरले असल्यामुळे त्यांना जिल्हा परिषद शाळेमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. याकडे महसूल विभाग लक्ष देऊन आहेत. त्यांना पाण्यातुन स्थलांतरित करतांना नायब तहसीलदार मारोतराव जगताप, मुगट चे मंडळधिकारी श्याम चौधरी, पत्रकार प्रल्हाद मस्के, राजेंद्र हामंद पोलीस पाटील, माधव हामंद , पुंडलिक सुर्यवंशी, सुरेश सुर्यवंशी, ग्यानु सुर्यवंशी, राम हामंद, साहेबराव मस्के, शिवा गड्रस या सह तरुण युवक आदी गावातील नागरिक मदत करीत आहेत. पुन्हा सांयकाळी डोनगाव येथील तलाठी पांडे, हे पुन्हा परत पूरग्रस्तांची चौकशी करून त्यांची राहण्याची भोजनाची व्यवस्था डोणगाव जिल्हा परिषद शाळेमध्ये करण्याचे नियोजन करण्यात आले. पहाटे पाच पासूनच ढगफुटी सदृश संततधार पावसामुळे डोणगांव येथील रस्त्यावर नदीचे स्वरूप आले आहे. उमरी रोडवर हायवे पासून गावातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी वाहून आल्याने गावच्या पूर्वेच्या दिशेतील ओहोळ पाण्याचा प्रवाह प्रचंड तुंबल्याने गावातील घरात पाणी शिरले. बालाजी सूर्यवंशी, शंकर मस्के, साईनाथ गोणेकर, चांदु सुर्यवंशी, राम सुर्यवंशी, रवी सुर्यवंशी, देऊबाई व्यंकटी गड्रस, पंढरी गड्रस, दत्ता उपासे, विजयमाला गायकवाड, सविता वाघमारे, सजन वाघमारे, गोविंद दनकट, गोविंद सोनटक्के, यासह नवीन आबादी डोणगांव मध्ये अनेक घरात पाणी शिरले आहे. प्रत्यक्षात महसूल चे नायब तहसीलदार मारोतराव जगताप लोकांना घराघरात जाऊन चौकशी करून सुरक्षित स्थळी जि. प. शाळेत नागरिकांना पाठवण्यात आले. ग्रामपंचायत ने पावसाळ्यापूर्वी नालेसफाई न केल्याने परिणामी नाल्यात कचरा साटुन नाल्यात पाणी व्यवस्थापन न झाल्याने सखल भाघात पाणी घुसल्या च्या नागरीक संताप व्यक्त करीत आहेत. आलेल्या पुराने मात्र ग्रामपंचायत चे नाली आणि कचरा सफाईचे काम मात्र पुर्ण झाल्याचे बोलले जात आहे.

# जरांगे चर्चेसाठी तयार असतील, तर सरकारही तयार —विखे पाटील

## ना.विखे पाटील व ना. दानवे यांच्यात शिर्डीत बंद दाराआड दीड तास चर्चा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, शिर्डी (अहिल्यानगर) :** जरांगे पाटलांशी चर्चेचा सध्या प्रश्नच उद्भवत नाही, कारण सरकार आधीपासूनच त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहे, या शब्दांत सरकारने मराठा आरक्षणासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. जरांगे पाटील आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे पाटलांनी सुरु केले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडी घडल्या आहेत. राज्याचे जलसंपदामंत्री आणि मराठा आरक्षण संदर्भात नेमलेल्या समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे ज्येष्ठनेते, केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यात बुधवारी शिर्डीत बंद दाराआड तब्बल दीड तास चर्चा झाली.

या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, जरांगे पाटलांबरोबर चर्चा करण्याचा प्रश्नच नाही. कारण आम्ही पहिल्यापासूनच ही भूमिका घेतली होती की सरकार या मागणीबाबत सकारात्मक आहे. आंदोलन करणे हा त्यांचा अधिकार आहे, परंतु चर्चेसाठी त्यांच्याकडून कोणताही प्रस्ताव आलेला नाही किंवा कोणत्या मुद्द्यांवर चर्चा करायची आहे, यासंदर्भात कोणताही संपर्क झालेला नाही. रावसाहेब दानवे यांच्या शिर्डी भेटीवर बोलताना ते म्हणाले, मंत्री दानवे व्यक्तिगत कामासाठी शिर्डीला आले होते, त्यानिमित्ताने आमची भेट झाली, मात्र आरक्षणाच्या विषयावर कोणतीही विशेष चर्चा झाली नाही. मात्र, सरकारने चर्चेचे दरवाजे बंद केलेले नाहीत, असे संकेतही त्यांनी दिले. जर जरांगे पाटलांनी भेटण्याची इच्छा व्यक्त केली, तर आम्ही त्यांना नक्की भेटू. सरकार आणि मुख्यमंत्री स्वतः त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहेत.

हैदराबाद गॅझेट लागू करण्याची त्यांची प्रमुख मागणी आहे आणि त्याचसाठी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. स्वतः जरांगे पाटलांचाही त्या समितीवर विश्वास आहे. आता या गुंतागुंतीच्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे यांना वेळ दिला पाहिजे. अशी विनंती आम्ही जरांगे पाटलांना केली आहे. असेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले. दानवे यांनी शिंदे समितीच्या अहवालाची प्रतीक्षा करण्याचे आवाहन केले. आता नव्याने आरक्षणाची मागणी सुरू झाली आहे. समाजाला आणि सरकारलाही आरक्षण मिळावे असे वाटते, पण ते न्यायालयाच्या आदेशाने रद्द झाले आहे. सरकार काही मुद्द्यांवर अभ्यास करत असून, त्यासाठी शिंदे समितीला मुदतवाढ दिली आहे. त्या समितीच्या अहवालाची वाट पाहिली पाहिजे. अहवाल आल्यानंतर सरकार तो स्वीकारेल पण शेवटी न्यायालयाचा निर्णय सर्वांना मान्य करावा लागेल,असे त्यांनी नमूद केले. एकंदरीत,जरांगे पाटलांचा मोर्चा मुंबईत धडकत असताना, शिर्डीत झालेल्या या दोन प्रमुख नेत्यांच्या बैठकीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. सरकार एकीकडे चर्चेची तयारी दर्शवत आहे, तर दुसरीकडे शिंदे समितीच्या अहवालावर आणि न्यायालयाच्या निर्णयावर भर देत आहे. त्यामुळे या आंदोलनावर सरकार काय तोडगा काढणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

